**महाराष्ट्र शासन**

क्र.एमडीएम-२०२३/प्र.क्र.१४१/काम-७
उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक :- २३/१०/२०२३

प्रति,

१) कामगार आयुक्त,
कामगार आयुक्तालय, कामगार भवन,
ब्लॉक ई, सी-२०,वांद्रे कुर्ला संकुल,
वांद्रे (पुर्व), मुंबई ४०००५१

२) सचिव तथा मुख्यकार्यकारी अधिकार,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
५ वा मजला,एमएमटीसी हाऊस,
वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व) मुंबई

विषय:- मध्यान्ह भोजन योजना बंद करणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मंडळाकडे नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असतात. त्यानुसार बांधकाम कामगार मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ च्या बैठकीत मध्यान्ह भोजन योजना प्रथम टप्प्यात विभागीय स्तरावर ई- निविदा पध्दतीने राबविण्यात यावी असा ठराव करण्यात आला होता. तदनंतर मंडळाने दि. २२.०६.२०१७, दि. १४.०२.२०१८ व दि. २८.०२.२०१८ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार शासनाने दि. १२.०३.२०१८ च्या पत्रान्वये प्रायोगिक तत्वावर मध्यान्ह भोजन योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती.

शासनाच्या मान्यतेनुसार मध्यान्ह भोजन योजना राबविण्यासाठी मंडळामार्फत दि. १९.३.२०१८ अन्वये ई - निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. मंडळामार्फत राबविण्यात आलेलल्या ई- निविदा प्रक्रियेमधील Request for proposal (RFP) मधील तरतुद खालीलप्रमाणे आहे.

> "Maharashtra Building and other Construction Workers Welfare Board, Mumbai (hereinafter referred to as "MBOCWW") has issued this request for proposal (hereinafter referred to as"RFP") for preparation, supply and distribution of freshly cooked Mid-Day Meal to registered workers at construction sites Kamgar Naka for the period of ३ years extendable to additional २ years as per the requirements of MBOCWW Board"

मंडळामार्फत राबविण्यात आलेल्या ई-निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाकार व दरस्वीकृतीचा प्रस्ताव दि. २५.०२.२०१९ अन्वये शासन मान्यतेस सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास शासनाच्या दि. ०१.०३.२०१९ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली व मंडळाने दि. ०५.०३.२०१९ अन्वये मुंबई, ठाणे व नागपूर व दि. ०६.०६.२०१९ अन्वये पुणे जिल्हयात नोंदीत बांधकाम कामगरांकरीता प्रायोगिक तत्वावर मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यास कार्यारंभ आदेश दिले.

वास्तविकत: मंडळामध्ये नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजन योजना रक्कम रू. ५/- च्या मोबदल्यामध्ये प्रायोगिक तत्वावर दि.०५.०३.२०१९ पासून सुरू करण्यात आली होती. तथापि दरम्यान कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे बांधकामाच्या ठिकाणावरील कामगारांची असलेली अल्प नोंदणी व तत्कालीन परिस्थती विचारात घेवून नोंदीत, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका कामगारांकरीता मध्यान्ह भोजन योजनेला आतापर्यंत वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

या प्रकरणी मला आपणास असे कळविण्याचे निर्देश आहेत की, सद्य:स्थितीत दि. १९.०३.२०१८ अन्वये राबविलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील Request for proposal (RFP) मधील तरतुदीस पाच वर्षाचा झालेला कालावधी तसेच वित्तीय व प्रशासकीय बाबी विचारात घेता, सदर मध्यान्ह भोजन योजना दि. ०१ नोव्हेंबर, २०२३ पासून बंद करण्यात यावी व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा. ही विनंती.

आपला,

(दा.सो. खताळ)

उपसचिव,महाराष्ट्र शासन